## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

जा.क्र.मराफऔवमं/लेखा/नि/९२४/१०
दिनांक- ११ फेब्रुवारी, २०१०

**विषय-** सन २००९-१० व २०१०-११ या आर्थिक वर्षांकरीता राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानाच्या राज्यातील ३३ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावर होणा-या खर्चाचे लेखे तयार करण्यासाठी व त्याचे मंडळ स्तरावर लेख्यांमध्ये एकत्रिकरण करण्यासाठी निविदा मागविणेबाबत..

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ ही संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चा अधिनियम २१ तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था असून तीची निर्मिती महाराष्ट्र राज्यामध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियान या दोन्ही केंद्र पुरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ याचा यापूढे मंडळ असा उल्लेख केलेला आहे, यास उपरोक्त दोन्ही अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात निधी उपलब्ध होत असतो. या दोन्ही अभियानांच्या वार्षिक कृति आराखडा मंडळाकडून तयार केला जातो व त्यास केंद्र शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर त्या त्या वर्षी या अभियानाखाली विविध घटक योजनांची अंमलबजावणी राज्यामधे केली जाते. या दोन्ही अभियानाची अंमलबजावणी राज्याच्या कृषि खात्यामार्फत तसेच अन्य संस्था जसे की, राज्य कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र, राज्य बियाणे महामंडळ इ.मार्फत केली जाते. त्यातील राज्याच्या कृषि खात्यामार्फत म्हणजे राफअ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या मार्फत ९० टक्के पेक्षाही अधिक निधी खर्च केला जातो. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिनस्त जिल्हास्तरावर या अभियानांच्या अंमलबजाणीसाठी वेगळे बँक खाते कार्यरत असून, मंडळाकडून संबधित जिल्ह्याला अग्रिमाच्या स्वरुपात दिला जाणारा निधी या खात्यामध्ये जमा केला जातो. राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यांपैकी मुंबई व मुंबई उपनगर वगळता अन्य ३३ जिल्ह्यामध्ये उपरोक्त अभियानांची अंमलबजावणी केली जाते.

जिल्हास्तरावर उपरोक्त दोन्ही अभियानांच्या लेखा विषयक कामासाठी पुरेसे अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवण्याच्या माहितीचा अभाव असल्यामुळे जिल्हास्तरावर विहित केलेल्या पध्दतीने लेखे ठेवले जात नाहीत, शिवाय सर्व ३३ जिल्ह्यांतील लेख्यांमध्ये एकसुत्रता नसते. यासाठी मंडळाने मागील काही वर्षापासून बाह्य संस्थामार्फत टॅली ९.० या संगणक आज्ञावलीचा उपयोग करुन सुसुत्र व विशिष्ट पध्दतीने जिल्हा व राज्य स्तरावरील लेखे तयार करण्याची कार्यपध्दती अवलंबलेली आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर, सन २००९-१० व २०१०-११ या आर्थिक वर्षांकरीता राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानाच्या राज्यातील ३३ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावर होणा-या खर्चाचे लेखे तयार करण्यासाठी व त्याचे मंडळ स्तरावर लेख्यांमध्ये एकत्रिकरण करण्यासाठी खाली विहित केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहून नामांकित सनदी लेखापालांच्या संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ**
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ दूरध्वनी : ०२०-२५५३५४४१, २५५१३२२८ फॅक्स : ०२०-२५५११३०२ ई-मेल : mshmpb_pune@rediffmail.com

**कामाचे स्वरुप**

१. प्रत्येक जिल्ह्यास मंडळाकडून प्राप्त झालेल्या निधीचे लाभार्थीनिहाय व घटक योजनानिहाय नोंदी टॅली ९.० लेखा संगणक आज्ञावलीमध्ये घेणे.
२. योजने अंतर्गत प्राप्त व वितरीत केलेल्या निधीचे जमाखर्च विषयक वेगवेगळी खाती तयार करणे.
३. वेगवेगळया निधी लेखाशीर्षाखाली लाभार्थ्यांचे लेजर तयार करणे.
४. रोखीने/बँकेने झालेल्या अदायगीची प्रमाणके, नियतकालीक (Journal) प्रमाणके, खरेदीची प्रमाणके याच्या नोंदी घेणे. भांडवली मालमत्तेच्या विनियोगासंबधीच्या नोंदी, जिल्हा अंतर्गत निधी हस्तांतरण, वैधानिक देय रकमा तसेच महसूली व भांडवली जमा व खर्चाच्या नोंदी घेणे.
५. वित्तिय वर्ष अखेरीचे ३१ मार्च रोजीचे जमा व खर्चाचे विवरण पत्र तयार करणे.
६. ३१ मार्च रोजीचे बँकेशी ताळमेळ घेवून (Bank Reconciliation) विवरण पत्र तयार करणे, तसेच ३१ मार्च पर्यंत अदा करण्यात आलेले परंतू बँकेतून न वटलेल्या धनादेश व धनाकर्षाची यादी तयार करुन टॅली आज्ञावलीत नोंदी घेणे.
७. प्रत्येक जिल्ह्याचे संबधित वर्षाचे लेखे पूर्ण केल्यानंतर विहित केलेल्या नमुन्यातील लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र तयार करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून प्रमाणपत्र व लेखे मंडळास सादर करणे.
८. सर्व जिल्हा कार्यालयांचे लेख्याचे मंडळ स्तरावरील लेख्यात एकत्रिकरण करणे व त्यानंतर मंडळाचे ३१ मार्च रोजीचे अंतिम जमाखर्चाचे विवरण पत्र तसेच ताळेबंद तयार करणे.
९. जिल्हा कार्यालयाचे लेखे तयार करताना आढळून आलेल्या महत्वाच्या बाबी/त्रुटी मंडळास सादर करणे.
१०. कामाचे सविस्तर स्वरुप समजणे करीता इच्छूक संस्थानी यापूर्वी मंडळाने जिल्हावार तयार केलेल्या लेख्याचे अवलोकन मंडळ कार्यालयात कार्यालयीन वेळेत येवून करावे.

**अटी व शर्ती**

१. निविदा सादर करताना संस्थेविषयीची माहिती खालील नमुन्यात सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | संस्थेचा पत्ता | |
| ३ | संस्थेच्या भागीदारांची नावे व पत्ता | |
| ४ | निविदे संबधी संपर्क साधावयाच्या व्यक्तीचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| ५ | संस्थेचा पॅन क्रमांक व सेवाकराचा तपशील | |
| ६ | संस्थेचा दुरध्वनी क्रमांक | |
| ७ | संस्थेचा ई-मेल | |
| ८ | फॅक्स क्रमांक | |
| ९ | लेखा विषयक कामाचे अनुभवाचा कालावधी | |
| १० | संस्थेतील कर्मचा-यांची संख्या | |

२. निविदा सादर करणारी संस्था पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील स्थानिक संस्था असावी.

३. सदर कामाकरीता संस्थेने त्यांचे कर्मचा-यांना आवश्यक सुविधा उदा.संगणक, टॅली संगणक आज्ञावली पुरविणे आवश्यक राहील. जिल्हास्तरावरील लेखे तयार करणेकरीता मंडळाकडून कोणतेही संगणक वा अन्य साधन सामुग्री पुरविता येणार नाही.

४. सदर कामाकरीता अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता व अनुभवाचा तपशिल निविदेसोबत सादर करण्यात यावा.

५. जिल्हा कार्यालयाचे लेखे तयार करण्यासाठी जिल्हयाचे ठिकाणी जाणा-या संस्थेच्या कर्मचा-याचे प्रवास, निवास व भोजन व्यवस्था सदर संस्थेने करणे आवश्यक राहील. त्याकरिता मंडळाकडून अथवा जिल्हा कार्यालयाकडून व्यवस्था केली जाणार नाही.

६. लेखे तयार करण्यासाठी लागणारे सर्व दस्तऐवज हे संबधित जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

७. जिल्हा कार्यालयास मंडळाने वितरीत केलेल्या निधीची माहिती मंडळाकडून उपलब्ध करुन दिली जाईल.

८. सर्व जिल्हा कार्यालयांचे लेखे ३१ मे पर्यंत पूर्ण करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र व लेखे करणे मंडळास सादर करणे आवश्यक राहील तसेच मंडळस्तरावरील लेख्यात त्याचे एकत्रिकरण करुन एकत्रित जमाखर्चाचे विवरण पत्र व ताळेबंद मंडळास १५ जून पर्यंत देणे आवश्यक राहील.

९. मंजूर निविदा धारकाने कामाच्या अनुषंगाने प्राप्त होणारी माहिती तसेच दस्ताऐवज हे गोपनीय ठेवणे बंधनकारक राहील.

१०. जिल्हा कार्यालयाचे लेखे तयार करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी भेटीचा कार्यक्रम आठ दिवस अगोदर मंडळास तसेच जिल्हा कार्यालयास कळविणे आवश्यक राहील.

११. दर आठवड्यातील कामाचा प्रगती अहवाल मंडळास वेळोवेळी सादर करणे आवश्यक राहील.

१२. इच्छूक संस्थेस संबधित कामाचे स्वरुप व त्याची व्यापकता याबाबतची माहिती मंडळाकडून उपलब्ध करुन दिली जाईल.

१३. वेळोवेळी होणा-या कामाच्या आधारावर निवड झालेल्या संस्थेस मंडळाकडे महिन्याच्या शेवटी सेवा शुल्काची अंशतः मागणी (झालेल्या कामाच्या प्रमाणात) करता येईल. मंडळ अशी मागणी तपासून योग्य असे सेवा शुल्क वेळोवेळी अदा करेल. मंडळाने याबाबत घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तथापि, एकूण मंजूर सेवाशुल्कापैकी ३० टक्के पेक्षा कमी नाही अशी रक्कम काम अंतिम झालेनंतरच अदा करण्यात येईल.

१४. मंडळाकडे पूर्वी समाधानकारक काम केलेल्या संस्था निविदेद्वारे प्राप्त झालेल्या किमान दराने काम करण्यास तयार असतील, तर त्यांची निविदा मंजूर करण्याचा अधिकार मंडळ राखून ठेवीत आहे.

१५. कामाच्या अनुषंगाने मंडळ कार्यालयातील अधिकारी/संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकारी यांचेशी समन्वय ठेवणे, सहकार्य करणे व त्यांच्या सूचनांचे अनूपालन करणे संबधित निविदा धारकावर बंधनकारक राहील.

१६. सदर निविदेतील अटी व शर्ती अथवा कामाचे स्वरूप यामध्ये बदल करण्याचे अधिकार तसेच निविदा प्रक्रियेतील काही भाग अथवा पूर्ण निविदा प्रक्रिया कोणतेही कारण नमूद न करता अगर पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मंडळ राखून ठेवीत आहे.

१७. मंडळास सर्वात कमी दराची निविदा मान्य करणे बंधनकारक असणार नाही. मंडळाच्या कामाकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार मंडळास राहतील.

१८. प्रस्तुतचे काम हे आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ करीता राहील. मंजूर निविदा धारकास निविदा मंजूर झाल्यापासून १० दिवसांचे आत मंडळाशी निविदेतील अटी व शर्ती तसेच मंडळास व मंजूर निविदा धारकास मान्य होतील अशा अटी व शर्तीवर करारनामा करावा लागेल.

**निविदा दाखल करण्याची कार्यपध्दती**

निविदा द्विलिफाफा बंद पध्दतीने दाखल करावयाचे असून भाग १ मध्ये संस्थेची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावयाची असून भाग २ मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील. सदर दोन्ही लिफाफे सिलबंद करून त्यावर अनुक्रमे **"राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत जिल्हा स्तरावरील लेखे तयार करणेकरीता निविदा भाग- १" "राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत जिल्हा स्तरावरील लेखे तयार करणेकरीता निविदा भाग-२"** असे नमुद करुन दोन्ही लिफाफे मंडळास निर्धारित केलेल्या कालावधी व वेळेपूर्वी विहित पध्दतीने मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

दरपत्रक खालील नमुन्यात सादर करण्यात यावे.

| कामाचे नांव | विहित केलेला दर रु. (एका वर्षाकरीता) |
|---|---|
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानाच्या राज्यातील ३३ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावर होणा-या खर्चाचे लेखे तयार करणे व त्याचे मंडळ स्तरावर लेख्यांमध्ये एकत्रिकरण करणेकरीता | |
| व्यावसायिक शुल्क | रु. |
| सेवा शुल्क | रु. |
| **एकूण** | रु. |

**निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण**

निविदा दाखल करण्याची अंतिम **दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० रोजी दु. १.००** वाजेपर्यत राहील. कोणत्याही कारणास्तव उशिरा प्राप्त होणा-या निविदांचा विचार केला जाणार नाही.

**पूर्व निविदा बैठक**

पूर्व निविदा बैठक **दिनांक २३ फेब्रुवारी, २०१० रोजी दु. ३.००** वा. मंडळाच्या उपरोक्त पत्त्यावरील विशेष कार्य अधिकारी यांचे कक्षात घेण्यात येईल. इच्छूक संस्थांनी कामाचे स्वरुप समजून घेणेसाठी पूर्व निविदा बैठकीस हजर रहाणे बंधनकारक आहे.

**निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण**

प्राप्त निविदा **दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० रोजी दु. ३.००** वा. मंडळाच्या उपरोक्त पत्त्यावरील व्यवस्थापकीय संचालक यांचे कक्षात उघडण्यात येतील. इच्छूक निविदाधारकांनी ओळखपत्रासह वेळेत उपस्थित रहावे.

**स्वाक्षरीत**
**व्यवस्थापकीय संचालक**
मराफऔवमं, पुणे

# जाहिरातीचा मसुदा

## जाहिर निविदा

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचेमार्फत राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत योजनांचे निधीच्या खर्चाचे, ३३ जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे लेखे तयार करण्याकरीता नामांकीत सनदी लेखापालाचे संस्थांकडून सिलबंद निविदा मागवित आहे. इच्छूक संस्थांनी अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळावर अथवा खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**www.mahanhm.gov.in**

**व्यवस्थापकीय संचालक**
**मराफऔवमं, पुणे**
**तळमजला, साखर संकुल,**
**शिवाजीनगर पुणे**

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव |
|---|---|
| १ | ठाणे |
| २ | रायगड |
| ३ | सिंधुदुर्ग |
| ४ | रत्नागिरी |
| ५ | नाशिक |
| ६ | धुळे |
| ७ | नंदुरबार |
| ८ | जळगांव |
| ९ | अहमदनगर |
| १० | पुणे |
| ११ | सोलापूर |
| १२ | सातारा |
| १३ | सांगली |
| १४ | कोल्हापूर |
| १५ | औरंगाबाद |
| १६ | जालना |
| १७ | बीड |
| १८ | लातूर |
| १९ | उस्मानाबाद |
| २० | नांदेड |
| २१ | परभणी |
| २२ | हिंगोली |
| २३ | बुलढाणा |
| २४ | अकोला |
| २५ | वाशिम |
| २६ | अमरावती |
| २७ | यवतमाळ |
| २८ | वर्धा |
| २९ | नागपूर |
| ३० | भंडारा |
| २१ | गोंदिया |
| ३२ | चंद्रपूर |
| ३३ | गडचिरोली |

**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ**
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ दूरध्वनी : ०२०-२५५३५४४१, २५५१३२२८ फॅक्स : ०२०-२५५११३०२ ई-मेल : mshmpb_pune@rediffmail.com